वाचले :- १) कार्यकारी अभियंता (स्था.) विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. पुणे यांचा दिनांक- १८/०१/२०१९ रोजीचा अर्ज

२) कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मुळशी विभाग यांचेकडील पत्र क्र. का.अ/मुळशी विभाग/पुणे/तां./०४५६ दिनांक ३१/०१/२०१९

३) उपविभागीय अधिकारी भोर उपविभाग भोरयांचेकडील पत्र क्र.जमीन/कावि/२०६०/२०१८ दिनांक १५/०१/२०१९

४) महाराष्ट्र शासन कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र. खपावि/भुमी/ ७५९४/सन २०१८ दिनांक ०१/१२/२०१८

५) उपअधीक्षक भुमी अभिलेख वेल्हे यांचेकडील पत्र क्र. भुमापन/अतामोर न३७०३/सन २०१८/४२६, दिनांक ०६/०९/२०१८

६) उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/ प्र.क्र.५०/ उर्जा-५ दि.११ एप्रिल २०१६

७) प्र.सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाख, पुणे यांचेकडील पत्र क्र पीएचए/मौ. जा.क्र.जागामागणी/ प्रा.यो.पुणे/पानशेत (कुरणखुर्द)/स.नं.४६ व ४७/ससंपु/२१९४, दिनांक २०/१२/२०१८

८) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम १९७१, नियम ३१

************************************************************

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
महसूल शाखा
क्र. पमग/सीआर/ ०२/२०१९
दिनांक- २१/०२/२०१९

जिल्हाधिकारी सत्यमेव जयते पुणे

विषय – जमीन-पुणे
मौजे पानशेत (कुरणखुर्द), ता.वेल्हे येथील स.नं.४६ व ४७ मधील ० हे २० आर जागा २२/११ केव्ही स्वीचिंग केंद्रासाठी म.रा. वि. वि. कंपनी मर्या. यांना आगाऊ ताबा देणेबाबत...

आदेश,

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. पुणे यांनी मौजे पानशेत (कुरणखुर्द) ता.वेल्हे जि.पुणे येथील जमीन गट क्र. ४६ व ४७ मधील ० हे. २० आर जागेचा २२/११ के.व्ही के.व्ही. उपकेंद्रा करीता भाडेपट्टयाने मिळणेबाबत दिनांक १८/०१/२०१९ विनंती केलेली आहे.

ज्याअर्थी, तहसिलदार वेल्हे यांनी सविस्तर चौकशी करुन उपविभागीय अधिकारी भोर यांनी त्यांचेकडील पत्र क्र जमीन/कावि/२०६०/२०१८ दिनांक १५/०१/२०१९ अन्वये अहवाल सादर केलेला आहे.

त्यानुसार मौजे पानशेत ता. वेल्हे जि. पुणे येथील ग.नं ४६ व ४७ पैकी ० हे २० आर क्षेत्र २२/११ के. व्ही. उपकेंद्रासाठी निश्चीत केले आहे. त्या जागेमध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण झालेले नाही. सदरची जागा ही पानशेत व खानापुर मुख्य रस्त्या लगत आहेत. सदर जागेस जाणेयेणेसाठी रस्ता उपलब्ध आहे. सदर जागेमधील स्मशानभुमी,

दफनभुमी, दहनभुमी अथवा उच्च दाब वाहीनी नाही. तरी सदरची जागा विदयुत वितरण कंपनीस विज उपकेंद्रासाठी देणेस हरकत नाही असे पंचनाम्यामध्ये नमुद केलेले आहे.

ज्याअर्थी, विषयांकीत जागा मागणीच्या अनुषंगाने नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, पुणे शाखा, पुणे यांचेकडील दि.२०/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये नियोजनाचे दृष्टीकोनातून अभिप्राय सादर केलेले आहेत. सदर अहवाल पाहता, स.नं.४६ व ४७ मौ. कुरणखुर्द, ता.वेल्हे, जि.पुणे ही जागा मंजूर पुणे जिल्हा प्रादेशिक योजनेनुसार वनीकरण विभागात समाविष्ट आहे. मंजुर प्रादेशिक योजनेतील तरतुदीनुसार वनीकरण विभागात Electric sub stations, receiving stations हा वापर अनुज्ञेय आहे. या जागेस प्रमुख जिल्हा मार्गाचे रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र वजाजाता उर्वरित या गट नं ४६ व ४७ पै मधील जमीन महावितरण कंपनीस उपलब्ध करुन देणेस नियोजनाच्या दृष्टीने पुढील अटीस अधीन राहुन उक्त जागेचे हस्तांतरण करणेस हरकत नाही. प्रादेशिक योजनेतील तरतुदीनुसार उक्त जागेमध्ये अर्जदार यांनी प्रस्तावित केलेल्या २२/११ के.व्ही. उभारणीचा वापर सदर वीज वितरण उपकेंद्राची जागा आंबी नदीच्य उच्चम पुरेषेपासुन सुरक्षित अंतरावर असल्याची खात्री पाटबंधारे विभागाकडुन करुन घेणेच्या अटीस अधिन राहुन अनुज्ञेय होईल असे नमुद केलेले आहे.

उपरोक्त नमुद अटीसह कार्यकारी अभियंता म. रा. वि. वि. कंपनी यांना २२/११ के.व्ही उपकेंद्रासाठी जागा देणेस हरकत नाही असे नमुद केलेले आहे.

ज्याअर्थी, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१६/प्र.क्र.५०/ ऊर्जा-५ दिनांक ११ एप्रिल, २०१६ अन्वये "उर्जा विभागांतर्गत महावितरण व महापारेषण या शासकीय कंपन्यांच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या राज्य व केंद्र पुरस्कृत ज्या योजनांना शासनाने मान्यता दिली आहे अश्या योजनांतर्गत विद्युत पायाभूत सुविधा व वीज उपकेंद्र उभारण्यासाठी प्रकरण परत्वे आवश्यक शासकीय जमीन सदर कंपन्यांना भाडे पट्टयाने रुपये १/- प्रति वर्ष या नाममात्र भुई भाडयाने ३० वर्षासाठी, त्याच तत्वावर पुढील नुतनीकरणाच्या तरतुदीसह उपलब्ध करुन देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सर्व संबंधित जिल्हाधिका-यांनी या शासन निर्णयातील कार्यपध्दतीस अनुसरुन त्यांच्या स्तरावरुन प्रकरणपरत्वे आवश्यक शासकीय जमीन सदर कंपन्यांना भाडेपट्टयाने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी", असे नमुद केलेले आहे.

त्याचाप्रमाणे दि.११ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयात असेही नमुद केले आहे की, १) "महावितरण व महापारेषण या कंपन्यांनी प्रथम संबंधित जिल्हा किंवा शहर यामधील शासन मंजुर योजनाअंतर्गत नियोजित विदयुत पायाभुत सुविधांचा आराखडा संबंधित जिल्हाधिका-यांकडे सादर करावा. त्यामध्ये त्या जिल्हयामध्ये / शहरामध्ये / नियोजित उपकेंद्रासाठी / विदयुत पायाभुत सुविधांसाठी लागणा-या ठिकाणांचा (Load Centers) जागेचा उल्लेख असावा. तसेच त्यामध्ये मुळ आराखडयापैकी सध्या सुरु असलेल्या योजनेतुन कोणती मंजुर कामे करण्याचे नियोजित आहे, त्याचा तपशिल असावा" असे नमुद आहे. २) तसेच जेवढा निधी सदर शासकीय जागेकरीता भरावा लागणार होता त्याऐवजी तेवढया रकमेच्या विदयुत

पायाभुत सुविधा त्या शहरात वा त्या जिल्हयात वाढवुन देण्याच्या अटीवर शासकीय जमीन दिर्घ कालावधीसाठी नाममात्र भाडेपट्टयाने कंपनीस उपलब्ध करुन देणेबाबत शासन निर्णयामध्ये नमुद आहे.

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, म.रा.वि.वि.कंपनी पुणे यांना उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.११ एप्रिल २०१६ अन्वये मौजे पानशेत, ता. वेल्हे, जि. पुणे येथील जमीन गट क्र. ४६ व ४७ मधील ० हे. २० आर क्षेत्राचे ३० वर्षासाठी रक्कम रुपये १/- नाममात्र भुई भाडयाची रक्कम रुपये ३०/- एवढी रक्कम शासन जमा करणे बंधनकारक राहील.

त्याअर्थी मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, पुणे महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ मधील नियम ३१ व शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१६/प्र.क्र.५०/ऊर्जा-५ दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजीच्या शासन निर्णया मधील तरतुदीनुसार मौजे पानशेत (कुरणखुर्द) ता. वेल्हे जि. पुणे येथील जमीन गट नं. ४६ व ४७ पैकी ० हे. २० आर (२०००-०० चौ.मी.) क्षेत्र कार्यकारी अभियंता (स्था.) पुणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना २२/११ के. व्ही. वीज उपकेंद्र उभारणे या वाणिज्य प्रयोजनाकरीता राज्य शासनाव्दारा अंतिम मंजूरीच्या वेळी विहीत केल्या जाणाऱ्या अटी व शर्तीस अधिन राहून खालील नमूद अटी व शर्तीवर आगाऊ ताबा देण्याचे आदेश पारित करीत आहे.

## अटी व शर्ती

१) कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित पुणे हे सदर जागा भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करतील

२) प्रतिग्रहीता विषयांकीत जागा ज्या प्रयोजनासाठी मंजूर करणेत आलेली आहे त्याच प्रयोजनासाठी जमीनीचा वापर करावा.

३) सदर जमिन शासनाच्या परवानगी शिवाय तारण / विक्री गहाण ठेवणार नाही वा तिचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही.

४) विषयांकीत जागा रुपये १/- या नाममात्र भुईभाडयाने ३० वर्षासाठी, त्याच तत्वावर पुढील नुतणीकरणाच्या तरतुदींसह देण्यात येत आहे. तथापी शासनाकडील कार्योत्तर मंजूरी आदेशातील अटी व शर्ती प्रतिग्रहिता यांचेवर बंधनकारक राहतील.

५) मंजूर करणेत आलेल्या जमीनीवर बांधकाम करताना मंजूर प्रादेशिक योजनेमधील विकास नियमावलीनुसार नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग पुणे यांचेकडून अभिन्यास मंजूर केल्यानंतर बांधकाम करण्यात यावे. तथापी विकास नियमावलीत काहीही तरतूद असली तरी बांधकाम फक्त ज्या प्रयोजनासाठी जमीनीचा ताबा देण्यात येत आहे त्या प्रयोजनासाठीच करण्यात येईल.

६) प्रतिग्रहीत्याने जागेचा ताबा घेतलेचे तारखेपासून दोन वर्षाचे आत जागेचा पूर्णरित्या वापर केला पाहीजे.

७) पर्यावरणाच्या पुर्नस्थापनेसाठी व संतुलन कायम राखण्याचे दृष्टीने विषयांकीत जागेत आवश्यक तेथे वृक्ष लागवड करणे बंधनकारक राहील

८) प्रतिग्रहीत्याने प्रदान केलेल्या जमीनीचा वार्षीक बिनशेतीकर प्रतिवर्षी शासनाचे प्रचलित दरानुसार नियमितपणे भरणे बंधनकारक आहे.

९) विषयांकीत जागेबाबत शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-०५/२००६/प्र.क्र.४३/ज-१, दि.३१ ऑक्टोबर, २००६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

१०) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५०/उर्जा-५, दि.११ एप्रिल २०१६ मध्ये नमुद निर्देशांचे तंतोतंत पालन करावे व त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करणे प्रतिग्रहिता यांचेवर बंधनकारक राहील.

११) प्र.सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा पुणे यांचकडील पत्र क्र. जागा मागणी/प्रा.यो.पुणे/पानशेत (कुरणखुर्द)/स.नं.४६ व ४७/ ससंपु/२१९४, दिनांक २०/१२/२०१८ मधील अटी व शर्ती प्रतिग्राहिता यांचेवर बंधनकारक राहतील.

१२) मंजुर आदेशातील अटींचा भंग झाल्यास अथवा प्रतिग्रहीता यांनी उक्त जमीन दिलेल्या प्रयोजनासाठी वापरात न आणल्यास अथवा सदर जमीन किंवा त्यापैकी काही जमीनीची अन्य महत्वाच्या प्रयोजनासाठी आवश्यकता आहे असे जिल्हाधिकारी यांचे मत झाल्यास सदरची जमीन काढून घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

१३) प्रतिग्रहित्याने उपरोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जमीन विना मोबदला सरकार जमा होण्यास पात्र राहील.

१४) उक्त जमीनीचा ताबा घेणेपूर्वी वरील सर्व अटी मान्य असलेबाबत प्रतिग्रहीता यांनी रक्कम रूपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी सो.<br>यांची स्वाक्षरी असे.

सही/-xxx<br>(नवल किशोर राम)<br>जिल्हाधिकारी पुणे

प्रति,

कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग<br>महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या. पुणे.<br>कक्ष क्र. ३०३, २ रा मजला, प्रशासकीय इमारत रास्ता पेठ पुणे-११

प्रत :- मा.अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत: मा. अवर सचिव, उदयोग ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई.

प्रत :- मा. आयुक्त पुणे , विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- उपविभागीय अधिकारी भोर उपविभाग भोर यांना माहितीसाठी रवाना.

प्रत :- तहसिलदार वेल्हे ता. वेल्हे जि.पुणे

२/- प्रस्तूतचे कामी अट क्र. १४ मध्ये सूचित केलेप्रमाणे उक्त जमीनीचा ताबा देणेपूर्वी वरील सर्व अटी मान्य असलेबाबत हमीपत्र तसेच अट क्र.१० मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही बाबतचे प्रतिग्रहिता कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या. पुणे यांचेकडून प्रथमत: हमीपत्र घेणेत यावे व तद्नंतर मौजे पानशेत (कुरणखुर्द) ता. वेल्हे, जि. पुणे येथील जमीन गट क्र.४६ व ४७ मधील ० हे.२० आर क्षेत्राचा ताबा रुपये १/- या नाममात्र भुईभाडयाने ३० वर्षासाठी, त्याच तत्वावर पुढील नुतणीकरणाच्या तरतुदींसह प्रतिग्रहिता यांस देवून त्याच्या योग्य नोंदी

गावचे दप्तरी घेवून दुरूस्त ७/१२ उतारा, जागेचा पंचनामा, ताबे पावती , जागेचा नकाशा यासह पुर्तता अहवाल सादर करावा. तसेच या आदेशातील अट क्र. २ प्रमाणे ७/१२ वर योग्य त्या नोंदी घेणेस संबंधिताना सूचित करावे.

प्रत:- उपअधिक्षक भुमि अभिलेख वेल्हे यांचेकडे माहीती व पुढील कार्यवाहीसाठी

प्रत:- राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११ ००१ यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

(प्रल्हाद हिरामणी)
तहसिलदार महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

PRH Lohagaon